महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ,

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, 49, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - 400 051.

दुरध्वनी क्र.26474435, Email : chairman-msbve@nic.in / msbve2003@yahoo.com Web site :- www.msbve.gov.in

**ई-मेलद्वारे**

क्र. मराव्यशिपमं/का-1/ मान्यता विभाग/2019/ ८८९

दिनांक : ०५/०९/२०१९

प्रति,

सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी

विषय : नुतनीकरण/ नवीन संस्था यासाठी अर्ज केलेल्या संस्थांचे निरीक्षण करणेबाबत.

उपरोक्त विषयासंदर्भात आपणास कळविण्यात येते की, 1 वर्ष, 2 वर्ष व 6 महिने अभ्यासक्रमासाठी सत्र 2019-2020 करीता विद्यार्थी प्रवेश करण्याची मुदत दिनांक 30/9/2019 पर्यंत वाढविण्यात आल्याचे दिनांक 31/8/2019 रोजीचे परिपत्रक आपणास यापूर्वीच पाठविण्यात आलेले आहे.

आपणास कळविण्यात येते की, ज्या संस्थांनी सत्र 2019-2020 करीता अभ्यासक्रमाचे नुतनीकरण करण्यासाठी On line अर्ज केलेले आहे अशा संस्थांचे निरीक्षण अद्याप केलेले नसल्यास त्या संस्थांचे निरीक्षण प्रथम प्राधान्याने करुन **जास्तीत जास्त 3 दिवसात दिनांक 10/9/2019 पर्यंत** निरीक्षण अहवाल On line पध्दतीने On line Portal वर अपलोड करावे.

त्याचप्रमाणे नवीन संस्थेसाठी / अभ्यासक्रमासाठी अर्ज केलेल्या संस्थांपैकी ज्या संस्थेचे निरीक्षण केलेले नाही अशा सर्व संस्थांचे निरीक्षण करुन त्यांचे निरीक्षण अहवाल On line Portal वर अपलोड करावे. या संस्थांना 2020-2021 या सत्राकरीता LOA देण्यात येईल याची नोंद घ्यावी व तशी कल्पना संबंधीत संस्थांना देण्यात यावी. सदर संस्थांना मान्यता देण्याची प्रक्रिया दिनांक 30 सप्टेंबर,2019 नंतर पूर्ण करण्यात येईल.

निरीक्षण करताना नुतनीकरणासाठी अर्ज केलेल्या संस्थांना प्राधान्य द्यावे. यापुढे याबाबतची मुदत वाढविण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

**टिप** :- संस्थांची मान्यता प्रक्रिया 3 टप्प्यांमध्ये पूर्ण होते. संस्थेने ऑनलाईन अर्ज केल्यानंतर प्रथमत: त्यांना Letter of Intent (LOI) देण्यात येते. त्यानंतर संस्थेचे इन्स्पेक्शन रिपोर्ट योग्य असल्यास त्यांना Letter of Acceptance (LOA) देण्यात येते. त्रुटींची पुर्तता केल्यानंतर व अनामत रक्कम भरल्यानंतर Letter of Student Admission (LOSA) देण्यात येते. त्यानंतरच संस्थांनी विद्यार्थी प्रवेश करावेत.

करिता सचिव

म.रा.व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ,

वांद्रे (पूर्व), मुंबई-51.

प्रत :-

1) मा. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-1 यांना सविनाय सादर.

2) मा. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

D:\2019\K-1 letter 2019.docx